# भारुडाच्या संगे भक्तीचा डांगोरा

प्रकाश खांडगे

भूवैकुंठ पंढरीत आज वैष्णवांची मांदियाळी टाळ-मृदुंगाचा घोष आणि विठु नामाचा गजर करीत स्थिरावली आहे. 'पंढरीचा वारकरी। वारी चुको न रे हरी।' या आंतरिक उर्मीने देव आणि भक्त यांचा केवळ संवाद नव्हे, तर हृदय-संवाद आज सुरू आहे. कथा, कीर्तने, प्रवचने, भारूडे, ललिते यांच्या रूपाने भक्तीचा झपूर्झा सुरू आहे. सोंग आणि संपादणी असा हा भक्तिनाट्याचा डांगोरा वारीतल्या मुक्कामात अन् पंढरी नगरीच्या मठात, फडावर सुरू आहे.

'बहुरूपी रूपे नटला नारायण। सोंग संपादून जैसा तैसा' असे संत तुकारामांनी म्हटले आहे. सोंग घेऊन संपादणी करण्याची परंपरा भागवत संप्रदायी भक्तिनाट्यात आहे आणि ही भक्तिनाट्ये पंढरीच्या वारीत मुक्कामाच्या ठिकाणी सादर होतात. ईश्वर आणि भक्त यांच्यातला द्वैतभाव गळून पडणे ही या भक्तिनाट्याची अंतःप्रेरणा असते. 'तुज मज नाही भेद। केला सहज विनोद' असे संतांनी देवाला म्हटले आहे. त्यामुळे संतांनी केलेल्या सहज विनोदाचे दर्शन वारीत भारूड-ललिते आणि विविध क्रीडांच्या निमित्ताने होते. ईश्वर बहुरूपी आणि त्याचे सोंग घेणारे भक्तही बहुरूपी अशी भूमिका या भक्तिनाट्यांमध्ये आढळते. संत तुकाराम महाराज म्हणतात-

नटनाट्य अवघे संपादिले सोंग।

भेद दाऊ रंग न पालटे ॥१॥

मांडियेला खेळ कौतुके बहुरूप।

आपुले स्वरूप जाणतोसे ॥२॥

स्फटिकाची शिळा उपाधि न मिळे।

भाव दावी पिवळे लाल संगे ॥३॥

तुका म्हणे आम्ही या जनाविरहित।

होऊनि निश्चिंत क्रीडा करू ॥४॥

क्रीडा आणि नटनाट्य या दोन गोष्टींभोवती भागवत संप्रदायातील भक्तिनाट्ये सातत्याने पिंगा घालीत आहेत. भारूडे, ललिते, कोकणातील दशावतार आणि कर्नाटकातील यक्षगान या सर्व प्रकारात केवळ ईश्वराचे संकीर्तन नसते. तर लीलादर्शन असते. हे लीलादर्शन विशिष्ट सोंगांच्याद्वारे होते. पंढरीच्या वारीत मुक्कामाच्या ठिकाणी भारूडे रंगतात, ललिते रंगतात अन् उभे रिंगण, गोल रिंगणात विशिष्ट क्रीडा रंगतात.

वारकऱ्यांमध्ये भारूड हा अतिशय लोकप्रिय प्रकार असून भजनी भारूड आणि सोंगी भारूड असे भारूडाचे दोन प्रकार आहेत. हे दोन्ही प्रकार वारीत सादर होतात. कारण नवविधा भक्तीत संकीर्तन भक्ती ही सर्वश्रेष्ठ समजली जाते. भारूड हे या संकीर्तन भक्तीचे प्रतीक आहे. पंढरीच्या वारीत आळंदी देहूपासून थेट पंढरपूरपर्यंत भारूडे सादर होतात. एकेकाळी राजू बाबा शेख यांचे 'वारी नृत्य' हे वारीतले आकर्षण असायचे. आज महाराष्ट्रात भारूडाची परंपरा सांभाळणारी काही निवडक मंडळी आहेत, ज्यात पंढरपूरच्या चंदाबाई तिवाडी, रहिमाबाद-औरंगाबादचे निरंजन भाकरे, अहमदनगरजवळचे हमीद सय्यद, अकलुजचे लक्ष्मण राजगुरू, तुकडोजीमहाराजांच्या परंपरेतील सप्तखंजिरी भजनवाले सत्यपाल महाराज, विजय पांडे यांचा उल्लेख करावा लागेल. मुंबईत सातारा, कोल्हापूर, सांगली, पुण्याकडची मंडळी सोंगी भारूड कामगार वस्तीत सादर करीत. भिकाजीबुवा गारगुटे, सखारामबुवा हांडे, माणिक हाडवळे अशा अनेक बुवांची नावे घेता येतील. पठणमध्ये भारूडांची फार मोठी परंपरा असून गोसावी कुटुंब भारूड सादर करीत असते. पठणचे प्रभाकर देशमुख हे देखील प्रख्यात भारूडकार होते.

भारूडांना संतसाहित्य आणि लोकसाहित्याचे गाढे संशोधक रा. चिं. ढेरे यांनी 'पारमार्थीकृत लोकसाहित्य' असे म्हटले आहे. 'बहुरूढ गीत ते भारूड' अशी व्याख्या पांगारकरांनी केली आहे. प्रा. नांदापूरकर यांनी 'गारूड' शब्दाचा संबंध 'भारूड' या संस्कृत शब्दाशी जोडला आहे. 'भरूंड' नावाचा दोन तोंडाचा पक्षी होता. भारूड देखील 'द्विमुख' असते, त्याचे दोन अर्थ असतात, त्यामुळे भरूंडवरुन भारुड असंही म्हटलं जातं. गारूड, भारूड, भारूडी, भरवड अशा विविध शब्दांचा संबंध रूपकाश्रयी अभंग असणाऱ्या भारूडाशी जोडला जातो. विविध देवदेवतांची भारूडे, देवदेवतांच्या उपासकांची भारूडे. पशु-पक्ष्यांची भारूडे, विविध समाज घटकांची भारूडे, विविध कर्मकांडाची, रीती-रिवाजांची, प्रथांची भारूडे अशी भारूडाची अनेक रूपे आहेत. संत एकनाथांनी सव्वाशे विषयांवर तीनशे भारूडे रचली आहेत. जोहार, गोंधळ, भारूडी, कौर, पाईक, बहिरा, पांगळा, मुका, वासुदेव, बाळसंतोष, भांड अशी भारूडे वारीत सादर होतात. दळण, कांडण, घाणा, डेरा, यासारख्या सांसारिक गोष्टी, कुत्रा, एडका, पोपट, विंचू यासारखे प्राणी, पक्षी यांच्यावर भारूडे बेतलेली असतात.

पखवाज, टाळ, वीणा या प्रमुख वाद्यांना साथ असणाऱ्या हार्मोनियमसह भारूड सुरू होते, ते विठ्ठल नामाच्या गजरात- 'ओम नमो जी ज्ञानेश्वरा'च्या निनादात. 'विठ्ठल' 'विठ्ठल' अथवा 'राधा

राधा कृष्ण राधा' या गजरात भारूडातील सोंगे म्हणजेच पात्रे आगमन-निर्गमनाची भूमिका पार पाडतात. भारूडाचे गायन, गायनानंतर भारूडाची संपादणी-निरूपण आणि पुन्हा गायन असे भारूड सादरीकरणाचे सूत्र असते. सोंगी भारूडात गणपती, ऋद्धी-सिद्धी, सरस्वती आगमन त्यानंतर भालदार, चोपदार, घडीदार अशी पात्रे, नंतर जोहार आणि मग रामायण, महाभारत, पुराणातील एखाद्या कथेवरील सोंगे म्हणजेच नाट्यरूप भारूड असा आकृतीबंध असतो.

भजनी भारूडात अभंग पंचक सादर होऊन रूपाचा अभंग आणि ध्यानाचा अभंग यानंतर क्रमाक्रमाने विवक्षित भारूडांचे गायन होते. भजनी भारूडात टाळ-पखवाजाचा गजर आणि नामगजर विशेषत्वाने असते. मुख्य गायक-बुवाच्या साथीला समूहगायनाची परंपरा असते. भजनी भारूडे विशिष्ट पारंपरिक चालींवर म्हटली जात असली, तरी आजकाल चित्रपट गीतांच्या चालीवर भारूडे सादर होतात. सोंगी भारूडातील सर्व सोंगे पुरुषच घेतात. एकेकाळी महिलांनी भारूड किंवा कीर्तन करणे वारकरी परंपरेतील कर्मठ मंडळींना मान्य नव्हते. परंतु मुक्ताबाई, जनाबाईच्या वारकरी परंपरेतील जैतुनबीसारखी महिला कीर्तनकार, गोदावरी मुंडेसारख्या भजनकार, चंदाबाई तिवाडींसारख्या भारूडकारांनी या कर्मठ बेड्या झुगारून दिल्या.

भारूडासारखेच 'ललित' हे भक्तिनाट्य प्रसिद्ध असून संत तुकारामांचा ललिताचा अभंग आहे- 'गळित झाली काया। हेचि ललित पंढरीराया'. काया गळित होणे म्हणजे स्वचा विसर पडणे. आत्मभान हरपणे. हे आत्मभान हरपून म्हणजे 'देहभान' विसरून 'देवभान' येणे म्हणजेच ललित होते. काल्याच्या कीर्तनाच्या प्रसंगी ललिते सादर होत. वारकरी ललित आणि हरदासी ललित असे ललिताचे दोन प्रकार आहेत. अभिनित भारूडे म्हणजे ललित 'सद्गुरू देवा प्रसाद देई झडकरी' या प्रसाद गाण्याने ललिताचा प्रारंभ होतो. टाळ, पखवाज, वीणा, हार्मोनियम ही वाद्ये ललितात वापरली जातात. सूत्रधार, गणपती, ऋद्धी-सिद्धी, सरस्वती, गावदिंडीगाण, राजदिंडीगाण, भालदार, चोपदार, छडीदार, सौरी, मुंडा, परदेसी, काशी कापडी, बाळसंतोष, राजवाध्या, गाववाध्या आदी पात्रे रात्रभर चालणाऱ्या ललितात येतात. 'रात्र थोडी सोंगे फार' हा वाक्प्रचार बहुधा ललितावरूनच आलेला असावा. रात्र सरली तरी ललितातील सोंगे सरत नाहीत. प्राचीन काळचे नाटक म्हणून ललितास संबोधण्यात येते. ललित म्हणजे सर्व पंथ, भाषा, समाज घटक, प्रवृत्ती, आचार-विचार यांचा संकर होय. पंढरीच्या वारीत भारुडाबरोबर ही ललिते आजही दिमाखाने सादर होतात.

पंढरीच्या वारीतील या भक्तिनाट्यांची मोहिनी नव्या शिक्षित पिढीवरही आहे. श्रद्धा आणि कुतूहल या दोन्हींच्या सीमारेषेवर आज या भक्तिनाट्यांकडे आपण आकर्षित होतो. सर्वसमावेशकता, समूहभान हे या भक्तिनाट्यांचे वैशिष्ट्ये असून पंढरीच्या वाटेवरील अबिर-गुलालाच्या पखरणीत ईश्वर संकीर्तनाचा सुलभ, सोपा मार्ग म्हणजे ही भक्तिनाट्ये, पंढरीच्या विठोबाचा नाट्यरूप सोहळा म्हणजे वारीतली भक्तिनाट्ये. किंबहुना ही भक्तिनाट्ये म्हणजे

भक्तीच्या रिंगणाचा चैतन्य सोहळा!